# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २१ जून, २०१९
## (सकाळी १०.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **गृह विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(२) **संसदीय कार्य मंत्री** : विधानसभेच्या सन २०१९ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ०८ आश्वासनांची यादी, तसेच सन २०१९ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ३४६ आश्वासनांच्या पूर्ततेचा विवरणपत्रे यादीसह सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(३) **ग्रामविकास मंत्री** : महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन २०१४-२०१५ चे वार्षिक एकत्रित वित्तीय व महसूली लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(४) **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८

अन्वये **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(५) शालेय शिक्षण व क्रिडा मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : पंचायती राज समितीचा बावीसावा, तेविसावा, चोविसावा व पंचविसावा अहवाल सभागृहास सादर करणे**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(गुरुवार, दिनांक २० जुन, २०१९ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शिविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना)**

(१) **सर्वश्री. अतुल भातखळकर, सुनिल शिंदे, ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पॅरासेलिंग करताना मुरूडमध्ये (जि. रायगड) दोर तुटून ५० फुटांवरून कोसळल्याने वेदांत पवार या १५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना माहे मे, २०१९ च्या अंतिम सप्ताहात घडलेली असल्याने कोकण किनारपट्टीवर हजारोंच्या संख्येने येत असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, मेरीटाईम बोर्डाच्या वॉटर स्पोर्ट्स धोरण, २०१५ नुसार रायगड जिल्ह्यातील मुरुडसह वरसोली, किहीम, नागाव, अलिबाग, रेवदंडा, काशीद, दिवेआगार, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, रत्नागिरी जिल्ह्यातील आरेवारे, रत्नागिरी, गणपतीपुळे, हर्णे, गुहागर, दाभोळ, आंजर्ले, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे वॉटर स्पोर्ट्सचे आयोजन करण्यात येणे, कोकण किनारपट्टीवर साहसी खेळ

सुरु झाल्यापासून पर्यटकांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली लक्षणीय वाढ, परंतु स्कुबा डायव्हिंग, स्नॉर्कलिंग, पाण्यातील इतर साहसी खेळ यांसाठी राज्यात कोणतीही ठोस नियमावली वा धोरण अस्तित्वात नसल्याचे या घटनेच्या निमित्ताने अधोरेखित झालेले असणे, परिणामी, पर्यटकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, मेरीटाईम बोर्डाने लागू केलेले धोरण हे केवळ पाण्यासाठी लागू असल्याने साहसी खेळांबाबत प्रश्न निर्माण झालेला असणे, साहसी खेळांबाबत नियमावली तयार करण्याबाबत पर्यटन विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे राज्यातील पर्यटकांमध्ये शासनाप्रती पसरलेली नाराजी, यास्तव कोकण किनारपट्टीवर सुरु असलेल्या साहसी खेळांबाबत तातडीने नियमावली तयार करण्याबाबत त्याचप्रमाणे राज्यातील विविध पर्यटनस्थळी बेकायदेशीर पॅरासेलिंग व्यवसाय करणाऱ्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची गरज याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.विजय वडेट्टीवार, प्रा. विरेंद्र जगताप, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. रणजीत कांबळे, अमिन पटेल, कुणाल पाटील, जयकुमार गोरे, अमित झनक, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात खाजगी कर्मचारी आणि महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या संगनमताने अभियांत्रिकी मॅकेनिक्स विषयाचा पेपर फुटल्याचे दिनांक २९ मे २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, परीक्षा विभागातील स्पायरल बाईंड या कंपनीच्या अधिनस्त खाजगी कर्मचाऱ्यांमार्फत वाशिम येथील संमती अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यापीठाच्या परीक्षा केंद्रावरून पेपर फुटलेला असणे, विद्यापीठातील खाजगी कर्मचाऱ्यांकडून पेपर सुरू होण्याच्या १० मिनिट अगोदरच प्रश्नपत्रिका मोबाईलवर वॉट्सॲपव्दारे पाठवत असणे, सदर प्रकार अनेक दिवसापासून सुरू असणे, सदर प्रकरणात विद्यार्थ्यांना पेपर विकून मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण होत असून यात विद्यापीठातील अनेक कर्मचाऱ्यांचा असलेला सहभाग, पेपर फुटल्यामुळे विद्यापीठातील गुणवंत विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान, विद्यार्थ्यांकडून तसेच विविध विद्यार्थी संघटनेकडून या प्रकरणावर निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी, याबाबत विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री.सुनिल प्रभू, अबू आजमी, प्रताप सरनाईक वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईसह राज्यात असलेली प्रसूतीगृहे (रुग्णालये) पालकांची परवानगी न घेता

बाळाची नाळ खाजगी औषधी निर्मिती कंपन्यांना विक्री करुन आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याचे दिनांक ६ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, नाळेमध्ये असलेले रक्तातील घटक हे औषधाच्या दृष्टीने मोलाचे असल्याने या नाळेचा उपयोग दुर्धर आजारावर उपचार म्हणून उपयुक्त ठरत असल्याचा औषध निर्मिती कंपन्यांनी दावा करणे, परंतू नाळेचा वापर औषधासाठी करण्याकरिता बाळाच्या पालकांची संमती घेणे आवश्यक असतानाही सदर खाजगी रुग्णालये (प्रसूतीगृहे) याबाबतच्या कोणत्याही निकषाचे पालन न करता आर्थिक गैरव्यवहार करुन औषध कंपन्यांना नाळ पूरवित असणे, प्रसूतीनंतर बाळाच्या नाळेचा वापर करणेबाबत कोणतेही निकष नसल्याचे आरोग्य विभागाच्या संचालकातर्फे सांगण्यात येत असणे, नाळेपासून औषधांची व इंजेक्शनची निर्मिती करणाऱ्या खाजगी कंपन्यांची वार्षिक उलाढाल दीडशे कोटीहून अधिक असणे, नाळेचा औषधासाठीच्या वापरावर राज्य शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे अशी प्रसूतीगृहे व औषध कंपन्यांवर अद्याप शासनाने कोणतीही कारवाई न करणे, अन्न व औषध अधिनियमात बाळाच्या नाळेच्या वापराबाबत व बेकायदा पूरवठा करणारे रुग्णालय आणि कंपन्या विरुध्द शासनाने कारवाई करण्याची तरतूद करण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, संदीप नाईक, अस्लम शेख, पांडुरंग बरोरा, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री नरहरी झिरवाळ, वैभव पिचड, सुरेश लाड, दिपक चव्हाण, किसन कथोरे, नरेंद्र पवार, गणपत गायकवाड वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"ठाणे जिल्ह्यातील उल्हास आणि वालधुनी नद्यांच्या प्रदूषणाबाबत अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर नगरपालिका आणि उल्हासनगर महापालिका परिसरामध्ये सांडपाणी वाहिन्यांची योग्य व्यवस्था नसणे, आतापर्यंत कोट्यवधी रुपये खर्चूनही सांडपाण्यावर प्रक्रिया करुन सदर पाणी नदीमध्ये सोडणाऱ्या योजना कार्यान्वित झालेल्या नसल्याचे माहे जून, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे, या नद्यांच्या क्षेत्रामध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची कमतरता असल्यामुळे घरगुती सांडपाणी तसेच परिसरातील औद्योगिक विभागातील प्रदुषित पाणी उल्हास नदीच्या पाण्यात थेट मिसळत असणे, केवळ बदलापूर शहरातील पनवेलकर संकुलातुनच दहा लाख तर हेंद्रेपाडा येथील नाल्यातुन १५ दशलक्ष लिटरपेक्षा जास्त सांडपाणी नदीत मिसळत असणे, परिणामी या नद्यांतील पाणी प्रचंड प्रदुषीत झालेले असणे, त्यामुळे स्थानिक नागरीकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असणे, या नद्यांतील प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.पर्यावरणमंत्री यांचेकडे दिनांक ७

जून, २०१९ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर प्रकरणी लवकर कार्यवाही न केल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिलेला असणे, उल्हास, वालधुनी नद्या प्रदुषणमुक्त करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक २० जून, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सहा : सर्वश्री रणधीर सावरकर, सुनिल प्रभु, राजेंद्र पाटणी, सुभाष साबणे, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री प्रशांत बंब, राजाभाऊ वाजे, शिवाजीराव नाईक, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री बाबुराव पाचर्णे, अनिल कदम, हरिष पिंपळे, संजय रायमुलकर, संजय शिरसाट, डॉ. सुनील देशमुख, सर्वश्री किशोर पाटील, उदयसिंग पाडवी, संदिपानराव भूमरे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री राजेंन्द्र नजरधने, ज्ञानराज चौघुले, समीर कुणावार, नारायण पाटील, संजय सावकारे, शंभुराज देसाई, हरिभाऊ जावळे, अनिल बाबर, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री प्रकाश आबिटकर, कृष्णा गजबे, उल्हास पाटील, सुरेश भोळे, सत्यजीत पाटील, बाळासाहेब मुरकुटे, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री नारायण कुचे, चैनसुख संचेती, शिवाजीराव कर्डिले, ॲड. आकाश फुंडकर, श्री गोवर्धन शर्मा, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री राजू तोडसाम, बाळासाहेब सानप, श्रीमती स्नेहलता कोल्हे, सर्वश्री रमेश बुंदिले, संजिवरेड्डी बोदकुरवार, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री सुधीर पारवे, चरण वाघमारे, कृष्णा खोपडे, संजय पुराम, तानाजी मुटकुळे, डॉ. तुषार राठोड, श्री.संतोष दानवे, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री आर.टी.देशमुख, अमल महाडिक, सुरेश हाळवणकर, महेश लांडगे, मनोहर भोईर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात तालुक्यांमध्ये माहे जून ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृद आर्द्रता, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यांपैकी १५१ तालुक्यांमधील १७,९८५ गावांमध्ये गंभीर/मध्यम स्वरुपाचा दुष्काळ शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजीपासून घोषित केला असणे, त्यानंतरच्या कालावधीत १५१ तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसुली मंडळामध्ये सरासरी पर्जन्याच्या ७० टक्के पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाले आहे अशा एकूण २६८ महसूली मंडळांतील ५,०९० गावांमध्ये शासनाने दुष्काळ घोषित केला असणे, तसेच ९३१ गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली असणे,

अशारीतीने राज्यातील एकुण ४१ हजार गावांपैकी २९ हजार गावांमध्ये दुष्काळ असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी मा. मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात येणे, प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई नियंत्रण व समन्वयासाठी स्वतंत्र कक्ष स्थापण्यात आला असणे, राज्यातील मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या जलाशयातील पाणीसाठा सन २०१८ च्या तुलनेत निम्मा किंवा त्याहूनही कमी असल्याची बाब निदर्शनास येणे, दुष्काळ घोषित केलेल्या किंवा दुष्काळसदृश परिस्थिती घोषित केलेल्या गावांतील शेतकऱ्यांना शासनाकडून जमिन महसूलात सूट, सहकारी संस्थांच्या कर्जाचे पुनर्गठण, मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांना पिक कर्जमाफी देण्यात येणे, शेतीशी निगडित कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषीपंपाच्या चालू विज बिलात ३३.५ टक्के सुट देऊन अंदाजे रुपये ६७३.४१ कोटीची सवलत देण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामांच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची विज जोडणी खंडीत न करणे, विज थकबाकी न भरल्याने बंद करण्यात आलेल्या ३,३२० पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरु करण्यात येणे, इ. धोरणात्मक निर्णय करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न, राज्यात १,२६४ ठिकाणी चारा छावण्या सुरु करण्यात येणे व त्यात सुमारे १० ते ११ लाख जनावरे असणे, चारा छावण्यांसाठी औरंगाबाद विभागीय आयुक्तांना १११ कोटी, पुणे विभागीय आयुक्तांना ४ कोटी व नाशिक विभागीय आयुक्तांना ४७ कोटींचा निधी वितरित करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास येणे, चारा छावण्यांच्या ठिकाणी तात्पुरती स्वच्छतागृहे उभारण्यात येणे, चारा पिकाच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना २५ हजार क्विंटल बियाणांचे वितरण करण्यात येणे व त्यातून ५८ हजार हेक्टर क्षेत्रावर चारा पिकाची लागवड करण्यात आल्याने एकूण ३० लाख मेट्रिक टन चाऱ्याचे उत्पादन झाले असणे, दिनांक १५ मे, २०१९ पासून चारा छावणीतील जनावरांच्या अनुदान दरामध्ये वाढ करुन मोठया जनावरांसाठी प्रतीदिन रुपये १००/- व लहान जनावरांसाठी प्रतीदिन रुपये ५०/- हा वाढीव दर लागू केला असणे, चारा छावणीत दाखल झालेल्या जनावरांच्या उपस्थितीसाठी आठवड्यातून स्कॅनिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, टँकर मंजुरीचे अधिकार उपजिल्हाधिकारी यांना व चारा छावणी मंजुर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असून मागणी होताच ताबडतोब टँकर व चारा छावणी मंजुर करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, सद्यःस्थितीत २८,५२४ गावांमध्ये दुष्काळ/दुष्काळ सदृश परिस्थिती घोषित करण्यात आली असणे व त्याअनुषंगाने १७,९८५ गावांना दुष्काळी अनुदान वाटप करण्यात आले असणे व उर्वरित १०,५३९ गावांना वर उल्लेखित इतर ८ सुविधा लागू करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास येणे, दुष्काळबाधित शेतकऱ्यांना कृषी विषयक मदत वाटप करण्यासाठी केंद्र शासनाकडून रुपये ४,७१४ कोटी रुपयांची मदत मंजूर करण्यात आली असणे, राज्यातील एकूण ६८,३०,८६५ शेतकऱ्यांना रुपये ४,५०८ कोटी रकमेच्या मदतीचे वाटप करण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील शेतकऱ्यांची विद्युत देयके थकित असल्याने बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांची विद्युत जोडणी पुर्ववत

करण्याकरिता शासनाकडून विद्युत देयके अदा करण्यात येणे व त्यापोटी मार्च, २०१९ अखेरपर्यंत रुपये १३२.३० कोटी इतका निधी खर्च झाला असणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात दिनांक ११ मे, २०१९ रोजी संपलेल्या आठवडयामध्ये एकूण ३६,६६० कामे चालू असून त्यावर ३,४०,९५२ इतकी मजूरांची उपस्थिती असल्याचे निदर्शनास येणे, चारा छावण्यांमधील पशुधनाची नोंदणी करुन पशुधनाच्या संख्येची दैनंदिन नोंद ठेवण्यासाठी अ‍ॅन्ड्राईड मोबाईलवर आधारित प्रणालीचा वापर अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे व शौर्य टॅक्नोसॉफ्ट प्रा.लि. या संस्थेने तयार केलेली प्रणाली विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात येणे, या संस्थेमार्फत सदर प्रणालीचा वापर करण्याबाबतचे एक दिवसीय प्रशिक्षण चारा छावणी चालकांचे पर्यवेक्षक/कर्मचारी तसेच महसूल विभागातील कर्मचारी यांना जिल्हास्तरावर उपलब्ध करुन देण्यात येणे, चारा छावण्यांमध्ये दाखल होणाऱ्या पशुधनांची रोगप्रतिकारक शक्ती व उत्पादन क्षमता कायम राहण्याकरिता त्यांना देण्यात येणारा हिरवा चारा, ऊसाचे वाडे, ऊस इ. खाद्याच्या प्रमाणात वाढ करुन मोठया जनावरांकरिता १८ कि.ग्रॅ. व लहान जनावरांकरिता ९ कि.ग्रॅ. याप्रमाणे खाद्याचे प्रमाण सुधारित करण्यात आले असणे, राज्यात प्रथमच शेळ्या-मेंढ्यांसाठी छावणी सुरु करण्याचा तसेच राज्यातील दुष्काळी भागात सुरु असलेल्या चारा छावण्यांमधील जनावरांसाठी टँकरने पाणी देण्याचा निर्णय मंत्रीमंडळ उपसमितीने दिनांक ३० मे, २०१९ वा त्यासुमारास घेतला असणे, सद्यःस्थितीत राज्यात ६,२०९ टँकरच्या माध्यमातून ४,९२० गावे आणि १०,५०६ पाड्यांवर पाणी पुरवठा केला जात असणे, राज्यात पिक विम्याच्या भरपाईपोटी आतापर्यंत ३४ लाख शेतकऱ्यांना २२ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले असल्याची बाब निदर्शनास येणे, मागील ४ वर्षात ४ कोटी ७२ लाख शेतकऱ्यांना १४,७७३ कोटी रुपये इतकी भरीव नुकसान भरपाई दिली असल्याचे निदर्शनास येणे, कापुस व धान पिकावरील किडीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेशिवाय ३,३३६ कोटी रुपयांची भरपाई शासनाकडून दिली असल्याची बाब निदर्शनास येणे, पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जवळपास सर्व जिल्ह्यांमध्ये आढावा बैठकांचे आयोजन करुन दुष्काळ नियंत्रणाचे कार्य युध्द पातळीवर सुरु असणे, जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावर क्षेत्रीय कर्मचारी प्रशिक्षणाचे व पेरणीपूर्व मशागती व तयारीबाबत विविध पिकांच्या शेतीशाळांचे आयोजन करण्यात येणे, दिनांक २४ मे ते ८ जून, २०१९ या कालावधीत उन्नत शेती, समृध्द शेतकरी अभियान राबविण्यात येणे, कृत्रिम पाऊस निर्माण करण्याच्या दृष्टीने होत असलेला प्रयत्न, तूर्तास पेरणी न करण्याबाबत आतापर्यंत जवळपास एक लाखाच्या वर शेतकऱ्यांना एसएमएसव्दारे सूचना करुन बियाणे वाया जाऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येऊन खरीपाचे नियोजन करण्याचा प्रयत्न इ. दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून गांभीर्याने करण्यात आलेल्या उपरोक्त उपाययोजना व कार्यवाही विचारात घेऊन त्याअनुषंगाने करावयाची कार्यवाही."

**(गुरुवार, दिनांक २० जून, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

सात : **सर्वश्री बाळासाहेब थोरात, अजित पवार, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, गणपतराव देशमुख, मो. आरीफ नसीम खान, दिलीप वळसे-पाटील, बसवराज पाटील, छगन भुजबळ, प्रा. वीरेंद्र जगताप, सर्वश्री शशिकांत शिंदे, सुनील केदार, जितेंद्र आव्हाड, मधुकरराव चव्हाण, ॲड. दिलीप सोपल, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. सतिश पाटील, श्री गोपालदास अग्रवाल, डॉ. मधुसूदन केंद्रे, सर्वश्री डी.पी. सावंत, राहुल जगताप, भारत भालके, राहुल मोटे, वसंतराव चव्हाण, हसन मुश्रीफ, संग्राम थोपटे, शिवेंद्रसिंह भोसले, डी.एस.अहिरे, राजेश टोपे, रणजित कांबळे, दत्तात्रय भरणे, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री बाळासाहेब पाटील, कुणाल पाटील, भास्कर जाधव, श्रीमती दीपिका चव्हाण, सर्वश्री काशिराम पावरा, प्रदीप जाधव-नाईक, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, कु. प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, सिध्दाराम म्हेत्रे, अमीन पटेल, विश्वजीत कदम, पांडुरंग बरोरा, संदीप नाईक, दिपक चव्हाण, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव-पाटील, सुरुपसिंग नाईक, पंकज भुजबळ, ॲड के.सी.पाडवी, श्री सुरेश लाड, श्रीमती सुमन पाटील, श्री बबनराव शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री नितेश राणे, कालिदास कोळंबकर, राणाजगजीतसिंह पाटील, संजय कदम, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सन १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळ निर्माण झाला असून अनेक जिल्हयात टँकरने पाणीपुरवठा होत असणे, राज्यातील दुष्काळी परिस्थिती सर्वसाधारणपणे सारखीच असताना सरसकट व एकाच वेळी दुष्काळ जाहीर न केल्यामुळे दुष्काळी उपाययोजना करण्यात दुर्लक्ष झालेले असून शेतकऱ्यांनी पेरणीसाठी खर्च केलेले हजारो कोटी रुपये वाया जाणे, पिण्याच्या पाण्यासाठी शासनस्तरावरुन टँकर, ना-दुरुस्त योजनांची दुरुस्ती व नवीन योजना वा अन्य उपाययोजना वेळीच न झाल्यामुळे महिलांना, दुष्काळी भागातील नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत असणे, सर्वेक्षणानूसार १८० तालुक्यात गंभीर दुष्काळ असूनही केंद्रीय दुष्काळ संहितेनूसार १५१ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात येणे, दुष्काळ जाहीर केल्यानंतर सुमारे ७ महिन्यानंतर जनावरांसाठी चारा छावण्या सुरु करण्यात आल्याने हजारो जनावरांचा मृत्यु होणे, मागणी करुनही चारा छावण्या सुरु करण्यात न येणे, सुरु असलेल्या चारा छावण्यांचे अनुदान प्रलंबित असणे, चारा छावणीमध्ये आरोग्य सुविधेच्या अभावामुळे जनावरांचा जीव धोक्यात येणे, पाणी व चारा टंचाईमुळे अनेक ठिकाणी पशुपालकांनी आपली जनावरे जंगलात मोकाट सोडून देणे, पाणी टंचाईमुळे राज्यातील दुग्ध व्यवसाय धोक्यात येणे, एनडीआरएफ व एसडीआरएफची मदत अद्याप लाखो शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीपासून लाखो शेतकरी वंचित राहिल्यामुळे बँकांनी साडेतेरा टक्के नियमीत व २ टक्के दंडनीय व्याजाची आकारणी केली असणे, एनपीएमुळे बँका चालू हंगामासाठी पीक कर्ज देण्यास नकार देत असणे, गेल्या ३

महिन्यात गारपीट व वीज कोसळून फळबागा व इतर पिके आणि घरांचे प्रचंड नुकसान व जिवीतहानी झालेली असणे, अद्यापही शासनाने नुकसानभरपाई जाहीर न करणे, बोंडअळी, तुडतुडा रोगाची जाहीर केलेली नुकसानभरपाई व दुध अनुदान अद्याप शेतकऱ्यांना मिळालेले नसणे, मागील २ वर्षापासून शेतकऱ्यांना पीकविम्याची नुकसान भरपाई मिळालेली नसणे, पीक विमा, हमी भाव, जलयुक्त शिवार अभियानात कोटयवधी रुपये खर्च करुनही दुष्काळग्रस्तांना कोणताही फायदा न होणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेत नाल्यातील गाळ काढणे याबाबीचा समावेश नसणे, कोकणातील मच्छिमार बांधव हे मच्छिव्यवसायावर अवलंबून असून पर्सीनेट मच्छिमारी व पारंपारिक मच्छिमारी याबाबत नेहमीच वाद सुरु असणे, शासनाकडून मच्छिमारांना कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नसल्याने त्यांच्यावर ओढवलेली उपासमारीची परिस्थिती, मत्स्य विद्यापीठ कोकणात होण्याबाबत मच्छिमार व नागरीकांची मागणी असतानासुध्दा शासनाने या मागणीवर अद्याप कोणताही निर्णय न घेणे, राज्यातील मराठवाडा, पूर्व विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांसह पंधरा ते सोळा जिल्ह्यांवर दुष्काळाचे सावट निर्माण झाले असणे, पावसाअभावी या जिल्ह्यांतील सुमारे एक लाख हेक्टरवर भाताची लागवड होऊ शकलेली नसणे, पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्याला पावसाने दगा दिला असणे, सांगलीतील जत, कवठेमहांकाळ, आटपाडी व खानापूर हे तालुके दुष्काळीस्थितीत असणे, समृध्दी महामार्गाकरीता मुरुम खोदकामाकरीता मनमानीपणे परवानगी देऊन गावातील गायरानाच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे लोहोगाव, नांदगाव, खेडे (जि.अमरावती) येथील अनिल चौधरी या शेतकऱ्याने आत्मदहन केल्याने झालेला मृत्यू, राज्यात सरासरीच्या शंभर टक्के पेरणी झाली असली तरी पावसाअभावी गतवर्षीपेक्षा चार लाख हेक्टर क्षेत्रावर कमी लागवड झाली असणे, दुष्काळामुळे शेतमजुरांना रोजगार मिळत नसल्यामुळे ते इतर राज्यात वा शहरीभागात रोजगारासाठी करीत असलेले स्थलांतर, यासाठी शासनाने या मजुरांना गावातच १०० दिवस मजूरी देण्याबाबत तातडीने करावयाची उपाययोजना, अनेक तालुका व महसूल मंडळातील शेतकरी पीक उत्पन्न कमी झाले असतानाही पीक विमा योजनेपासून वंचित राहणे, पाणी टंचाईच्या उपाययोजना राबविण्याबाबत तसेच मंजूरीबाबत महिनोमहिने विलंब लागत असणे, केंद्राचे दुष्काळ घोषित तालुके व राज्याच्या दुष्काळ घोषित तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूरीत तफावत आढळून येणे, सन २०१६ व २०१७ मध्ये घोषित झालेल्या नुकसान भरपाईपासून अनेक शेतकरी वंचित राहणे, राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेतलेल्या विविध विकास सहकारी संस्थेचे शेतकरी सभासद कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असणे, दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची आवश्यकता असतानाही त्याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, अशा परिस्थितीत राज्यातील शेतकरी आत्महत्येच्या मानसिकतेमध्ये असून सरसकट संपूर्ण कर्जमाफी करण्याची आवश्यकता असताना शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यास शासन हतबल असणे, राज्यातील भीषण दुष्काळाला तोंड देण्यास शासन अकार्यक्षम असल्याची शेतकऱ्यांमध्ये व जनमानसांत पसरलेली भावना, याबाबत शासनाने परिणामकारक उपाययोजना करुन राज्यात दुष्काळी भागातील जनतेला दिलासा देण्याची आवश्यकता."

**आठ : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, कुणाल पाटील, अस्लम शेख, बसवराज पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ – महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, शेख आसिफ शेख रशीद, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप**

**वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश टोपे, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. हर्षवर्धन सकपाळ, अमिन झनक, प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, बसवराज पाटील, ॲड.त्र्यंबकराव भिसे, शेख असिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ – महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (पुढे चालू ठेवणे) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (पुढे चालू ठेवणे) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, शेख आसिफ शेख रशीद, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (पुढे चालू ठेवणे) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश टोपे, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (पुढे चालू ठेवणे) (सुधारणा) विधेयक, २०१९ विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (पुढे चालू ठेवणे) (सुधारणा) विधेयक, २०१९ विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त

समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (पुढे चालू ठेवणे) (सुधारणा) विधेयक, २०१९ विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, बसवराज पाटील, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, शेख आसिफ**

**शेख रशीद, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजेश टोपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वेडट्टीवार, बसवराज पाटील, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाबासाहेब

पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ — स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, अमिन पटेल, राहूल बोंद्रे, संग्राम थोपटे, शेख आसिफ शेख रशीद, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश टोपे, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - स्पायसर ॲडवेनटिस्ट

विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमिन पटेल, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. भास्कर जाधव, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. वैभव पिचड, राणा जगजित सिंह पाटील, भारत भालके, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, बसवराज पाटील, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, प्रदिप नाईक, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. दिलीप वळसे पाटील, संग्राम थोपटे, संजय कदम, संदिप नाईक, हसन मुश्रीफ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, संग्राम थोपटे, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर

करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(६)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री भारत भालके, पृथ्वीराज चव्हाण, अबू आजमी, अस्लम शेख, कुणाल पाटील, डी. पी. सावंत, विजय वडेट्टीवार, त्र्यंबकराव भिसे, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-

"ही विधानसभा सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ – महाराष्ट्र कृषि विद्यापीठ आणि महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१९ नापसंत करते."

(ख) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र कृषि विद्यापीठ आणि महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१९**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, संग्राम थोपटे, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र कृषि विद्यापीठ आणि महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(७)** (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – श्री बालाजी विद्यापीठ, पुणे**

**विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, संग्राम थोपटे, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ — श्री बालाजी विद्यापीठ, पुणे विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ — श्री बालाजी विद्यापीठ, पुणे विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

## अशासकीय कामकाज

### (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(२) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८२ - महाराष्ट्र देवता, संत, राष्ट्रपुरुष, धर्मग्रंथ यांचे विडंबनावर नियंत्रण विधेयक, २०१७ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे**

(३) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक १९- महाराष्ट्र अनुसूचित जाती उप-योजना (वित्तीय साधनसंपत्तीचे नियोजन, नियतवाटप आणि वापर) विधेयक, २०१८-

**ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स. यांचे**

(४) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २०- महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(५) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २१- महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(६) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २२- जमिन महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) (सुधारणा) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(७) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २३- नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.अमित साटम, वि.स.स. यांचे**

(८) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २४- महाराष्ट्र जनजाति उप-योजना (वित्तीय साधनसंपत्तीचे नियोजन, नियतवाटप आणि वापर) विधेयक, २०१८- **ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स. यांचे**

(९) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २५ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन विधेयक, २०१८ - **श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे**

(१०) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५२ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे**

(११) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५३ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०१८ - **श्री.अमीत साटम, वि.स.स. यांचे**

(१२) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५४ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, २०१८ - **श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचे**

(१३) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८१ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०१८ - **श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स. यांचे**

(१४) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८२ - महाराष्ट्र वेश्म मालकी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.राहुल कुल, वि.स.स. यांचे**

(१५) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८३ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, २०१८ - **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे**

(१६) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८४ - महाराष्ट्र राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०१८ - **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे**

(१७) सन २०१९ चे वि.स.वि.क्रमांक २६ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१९ - **श्री.योगेश घोलप, वि.स.स यांचे**

(१८) सन २०१९ चे वि.स.वि.क्रमांक २७ — महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात फलक लावण्यास, समाज माध्यमावर व संकेतस्थळावर प्रसिध्द होण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१९ - **श्री.सुनिल केदार, वि.स.स यांचे**

**दहा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(सदरहू ठराव बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आले आहेत) (क्रमांक १ ते ३)**

(१) **डॉ. सतीश पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. ८२**

"राज्यात उद्योग जगतात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने

राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३५९**

"राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या वाहनांची जास्त वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावेत तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अद्ययावत असलेल्या जे.एच.अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा २४ तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८०**

"राज्यातील विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण, यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २० जून, २०१९

**जितेंद्र भोळे**
सचिव (का.)
महाराष्ट्र विधानसभा